नाशिक जिल्हा परिषद नाशिक सामान्य प्रशासन विभाग दुरध्वनी क्रमांक ०२५३-२५११०१०

जाक्र/साप्रवि/आस्था-६/३७५/२०१७
नाशिक दिनांक २२ / ०८ /२०१७

## परिपत्रक

**विषय :- विनापरवानगी जि.प.मुख्यालयात अधिकारी/कर्मचारी यांनी न येणे बाबत.**

माझे असे निदर्शनास आले आहे की, जि.प.मुख्यालयात एकुण १५ विभाग असुन खाते प्रमुख गट विकास अधिकाऱ्यांना जि.प.मुख्यालयात बैठकीसाठी बोलवत असतात त्यामुळे गट विकास अधिकारी यांनाही गट स्तरावर विकास कामांकडे लक्ष देणेस पुरेसा वेळ मिळत नाही. त्यामुळे त्याचा विपरित परिणाम विकास कामांवर होतो. या बाबत ग्रामस्थांच्याही तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. तरी याद्वारे कळविण्यात येते की, यापुढे गट विकास अधिकारी यांना आढावा बैठकीसाठी उपस्थित रहाणेकामी बोलविणे अत्यंत आवश्यक असेल तर माझे लेखी परवानगी घेतल्याशिवाय बोलविण्यात येवु नये.

तसेच गट स्तरावरील बरेचशे गट क व गट ड संवर्गातील कर्मचारी हे रोज जि.प.मुख्यालयात विभागात व इतरत्र फिरतांना दिसतात यापुढे नियमित टपाल घेवुन येणाऱ्या गट ड कर्मचारी यांचे व्यतिरिक्त गट विकास अधिकारी यांची पुर्व परवानगी शिवाय कोणताही कर्मचाऱ्यास जि.प.मुख्यालयात पाठवु नये. तसेच खाते प्रमुखांनी आवश्यकता असल्यासच गट स्तरावरील कर्मचारी यांना बोलवावे

22/08

(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,नाशिक

Scanned by CamScanner